**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**,
Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JAN-FEB 2022, VOL- 9/69

# मराठीतील आत्मचरित्र लेखन : एक आढावा

**डॉ. उत्तरेश्वर ज्ञानोबा सुरवसे**,
सहायक प्राध्यापक (मराठी विभाग), वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

**Paper Received On:** 18 FEB 2022
**Peer Reviewed On:** 28 FEB 2022
**Published On:** 1 MAR 2022

मराठी साहित्यात कविता, कथा, कादंबरी व नाटक या साहित्यप्रकारांप्रमाणेच 'आत्मचरित्र' हा साहित्यप्रकार महत्त्वाचा आहे. त्यातून आत्मचरित्रकाराच्या 'स्व' जीवनाचा विस्तृत पट मांडला जातो. मराठीत अलिकडे या साहित्यप्रकारात मोठ्या प्रमाणावर लेखन होत आहे. तसेच वाचकांचा उत्तम प्रतिसादही लाभतो आहे. 'लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वतःच्याच शब्दांत सांगितलेली कहाणी महणजे आत्मचरित्र.' अशी साधारणतः आत्मचरित्राची व्याख्या केली जाते. हा साहित्यप्रकार इतर साहित्यप्रकारांपेक्षा निराळा आहे. तो काल्पनिक नसतो. तर त्यातील चित्रण हे वास्तवाधिष्ठीत असते. त्यात सत्याचा अभास किंवा काल्पनिकतेला महत्त्व दिले जात नाही. त्यातील माणसे, त्यांचे जगणे व अनुभव हे प्रत्यक्षातील असतात. म्हणून आत्मचरित्र लेखनाचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण असते. त्याचा आवाकाही मोठा व विस्तृत असतो. त्याचे लेखन करणारा आत्मचरित्रकार हाच त्याचा लेखनविषय असतो. आत्मचरित्रकाराच्या जन्मापासून ते आयुष्याच्या अखेरच्या कालखंडापर्यंतचा प्रदीर्घ पट आत्मचरित्रात चित्रित होतो. त्याचबरोबर समकालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, व सांस्कृतिक स्थितीगतीशीही आत्मचरित्राचे जवळचे नाते असते. म्हणजेच आत्मचरित्रकार स्वतःच्या जीवनातील विविध घटना-प्रसंग सांगत सांगत तत्कालीन समाजातील विविध घटना-घडामोडी व स्थितीगतीचेही दर्शन आपल्या आत्मचरित्रातून घडवत असतो.

आत्मचरित्राचे लेखन विविध हेतूंनी केले जाते. आपले जगणे इतरांना सांगावे, आपल्या मनातील भावभावना, विचार लोकांना सांगून आपले मन हलके करावे, आयुष्याच्या अखेरच्या काळात एक विरंगुळा म्हणून लेखन करावे, तसेच आपल्याविषयी जे सम-गैरसमज जनमानसात पसरले गेले आहेत त्याचे निराकरण करावे असे विविध हेतू व्यक्तिपरत्वे आत्मचरित्र लेखनामागे असलेले दिसतात. मराठी साहित्यात या लेखनाला प्रदीर्घ परंपरा लाभलेली आहे. ती थेट मध्ययुगीन मराठी साहित्यातील महानुभाव व वारकरी

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

संप्रदायापर्यंत पोहोचते. परंतु त्याकाळी आजच्यासारखी स्वतंत्रपणे आत्मचरित्र लेखन करण्याची प्रवृत्ती दिसत नाही. ती प्रवृत्ती आधुनिक काळापासून वाढीस लागेलेली दिसते.

'आत्मचरित्र' हा साहित्यप्रकार आधुनिक काळापासून वाढीस लागलेला दिसतो; परंतु त्यापूर्वीही मराठीत आत्मचरित्र लेखनाचे धागेदोरे सापडतात. महानुभाव पंथाचे श्रीचक्रधरस्वामी यांचे लीळाचरित्र ग्रंथात आत्मचरित्र आले आहे. वारकरी संप्रदायातील सर्वच संतांच्या अभंगात 'आत्मपर निवेदन' आलेले आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत जनाबाई, संत तुकाराम व संत बहिणाबाई इत्यादी वारकरी संतांनी आपल्या मनातील भक्तीचा आविष्कार करत करत आपला आत्माविष्कारही प्रकट केलेला आहे. ती त्यांची त्याकाळची आत्मनिवदतेच आहेत. परंतु आधुनिक आत्मचरित्रांप्रमाणे त्यांचे स्वरूप नाही. तथा त्यात सलगपणाही नाही. तसेच ती आजच्या आत्मचरित्रांप्रमाणे जाणीवपूर्वक लिहीलेली नाहीत. 'आपण आपल्या आत्मचरित्राचे लेखन करावे' अशी त्यामागे धारणाही नाही. परमेश्वराची भक्ती करत असताना जे जीवन वाट्याला आले ते व संसारिक जीवनातील राग, लोभ, सुख-दुःख इत्यादीकांचे वर्णन संतांनी आपल्या लेखनातून केलेले दिसते. खरे तर आपण आपले आत्मचरित्र लिहीले पाहीजे हा दृष्टिकोन या काळात नव्हता. हा दृष्टिकोन आधुनिक मराठी साहित्यात दिसतो. त्यातूनच आधुनिक मराठी साहित्यात आत्मचरित्र लखनाचे दालन समृद्ध झाले. तसेच त्याला एक स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणूनही प्रतिष्ठा प्राप्त झाली. सामान्यातल्या सामान्य माणसांपासून ते थेट असामान्य माणसांपर्यंत या साहित्यप्रकारात लेखन सुरू झाले.

ब्रिटीशपूर्व कालखंडातील नाना फडणवीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, विष्णुबुवा ब्रम्हचारी, वासुदेव बळवंत फडके यांची आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली. यानंतर दादोबा पांडुरंग यांचे 'अरुणोदय', निरंजन माधव यांचे 'संप्रदाय परिमळ' ही आत्मचरित्रे अव्वल इंग्रजी कालखंडाल लिहीलेली आहेत. त्याचबरोबर इंग्रजी आत्मचरित्रांचेही काही अनुवाद मराठीत झाले आहेत. त्यातील वि. दा. सावरकर यांनी 'जोसेफ मॅझीनी' यांच्या आत्मचरित्राचा केलेला मराठी अनुवाद लक्षणीय आहे. या काळात आत्मचरित लेखनाला फारसा बहर आलेला दिसत नाही. जे काही लेखन केले ते थोरा मोठ्यांनीच केले. ती गोष्ट सर्वसामान्यांच्या आवाक्यातली नव्हती. नंतर मात्र परिस्थितीत बदल होत गेला. पुरुषांबरोबरच स्त्रीयांनीही मोठ्या प्रमाणात आत्मचरित्रांचे लेखन केले. त्याचबरोबर दलित, आदिवासी इत्यादी उपेक्षित, वंचित वर्गातूनही मराठीत आत्मचरित्र लेखन सुरु झाले. त्यामुळे उत्तरोत्तर मराठी आत्मचरित्र लेखनाचे क्षेत्र व्यापक होत गेले. शिवाय साहित्यिक, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, उद्योगपती, राजकीय नेते, पत्रकार, मराठी कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्य सेनानी व प्रशासकीय सेवेतील कर्तव्यदक्ष अधिकारी अशा विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने यशोशिखर गाठणाऱ्या अनेक महनीय व्यक्तींची आत्मचरित्रे मराठीमध्ये प्रसिद्ध होऊ लागली. त्यामुळे मराठी

आत्मचरित्र लेखनाचा आवाका वाढला. त्याला अनेकविध धुमारे फुटले. त्याचा विचार विषयक्षेत्रांनुसार खालीलप्रमाणे करता येईल.

मराठीत स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर साहित्यलेखन केले आहे. त्यात स्त्रियांची आत्मचरित्रांचे हे एक स्वतंत्र दालन आहे. आत्मचरित्र लिहीणाऱ्या स्त्रियांचीही मोठी संख्या आहे. त्यामुळे मराठीत स्त्री आत्मचरित्र लेखनाला मोठी परंपरा लाभलेली दिसते. स्त्रीयांमध्ये जसजसा शिक्षणाचा प्रसार होत गेला तसा स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर आपले कर्तृत्व सिद्ध करायला वाव मिळाला. राजकारण, समाजसेवा, चित्रपट, संगीत, शिक्षण इत्यादी क्षेत्रात स्त्रीया पुढे आल्या. अशा विविध क्षेत्रात वावरलेच्या स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर आत्मचरित्रांचे लेखन केले आहे . या आत्मचरित्रांची पतिचरित्रे, घरगुती स्त्रियांची आत्मचरित्रे, पती-पत्नीच्या सहजीवनाची आत्मचरित्रे, साहित्यिकांच्या पत्निनी लिहीलेली आत्मचरित्रे, दलित-आदिवासी-भटक्या समाजातील स्त्रीयांची आत्मचरित्रे अशा वेगवेगळ्या विषयांनुसार मराठीतील स्त्रियांच्या आत्मचरित्रांचा विचार करावा लागतो. त्या अनुषंगाने उज्जला गोखले यांचा मराठीतील स्त्रियांच्या आत्मचरित्रांच्या संदर्भातील पुढील अभिप्राय महत्त्वाचा आहे. "स्त्रियांच्या आत्मचरित्र साहित्याचा इतिहास किमान सव्वाशे वर्षे जुना आहे. या सव्वाशे वर्षांच्या काळात स्त्रीजीवनात वेगवेगळी स्थित्यंतरे घडली. बालविवाह होऊन सासरी जाणाऱ्या अपरिपक्व मुलीपासून ते राजकारणात, समाजकारणात, वैद्यकशास्त्रात चित्रपट-संगीत-नृत्य-नाट्य यांसारख्या कलाजीवतान, देशपरदशांत वावरणाऱ्या स्त्रियांचे दर्शन ही आत्मचरित्रे घडवितात. आईवडीलांनी वा घरातील प्रौढांनी जमविलेल्या मुलीच्या विवाहापासून तो प्रेमविवाह करणाऱ्या स्त्रियांपर्यंतच्या कुटुंबजीवनाचा व त्यांच्या घरातील आणि समाजातील स्थानाचा बोधही ही आत्मचरित्रे घडवितात."[१] यावरून मराठीतील स्त्रीयांच्या आत्मचरित्र लेखनाची व्यापकता लक्षात येते.

स्त्रीयांच्या आत्मचरित्र लेखनात मैलाचा दगड ठरणारे आत्मचरित्र म्हणजे लक्ष्मीबाई टिळक यांनी लिहिलेले 'स्मृतिचित्रे' हे आत्मचरित्र आहे. त्यातून त्यांचे पती रेव्ह. टिळक यांचे विस्तृत चित्रण आले आहे. याशिवाय बाया कर्वे यांचे 'माझे पुराण', पार्वतीबाई आठवले -'माझी कहाणी', कमलबाई देशपांडे- 'स्मरणसाखळी, लक्ष्मीबाई पटवर्धन - 'माझा नंदादिप', रमाबाई केदार - 'वेचलेले मणी', अन्नपूर्णाबाई रानडे – 'स्मृतितरंग', इंदिराबाई भागवत – 'या सदाशिराव', सत्यभामाबाई सुखात्मे- 'गेले ते दिवस', पार्वतीबाई साठवले – 'माझी कहाणी', शांता आपटे – 'जाऊ मी सिनेमात, हंसा वाडकर – 'सांगते ऐका', दुर्गा खोटे- 'मी दुर्गा खोटे', कुमुद पावडे – 'अंत:स्फोट', मुक्ता सार्वगौड – 'मिटलेली कवाडे', शांताबाई दाणी - 'रात्रंदिन आम्हा', उर्मिला पवार – 'आयदान' अशी कितीतरी असंख्य मराठी स्त्री आत्मचरित्रे सांगता येतील.

स्त्रीयांच्या आत्मचरित्रांप्रमाणे साहित्यिकांनीही विपुल प्रमाणात आत्मचरित्रांचे लेखन केलेले आहे. साहित्यिकांना लेखन कौशल्ये अवगत असल्यामुळे त्यांनी लिहिलेली मराठी आत्मचरित्रे अधिक वाचनीय झालेली आहेत. यातील न .चिं. केळकर – 'गतगोष्टी', ग. त्र्यं. माडखोलकर- 'दोन तपे', प्र. के. अत्रे- 'मी कसा झालो' व 'कऱ्हेचे पाणी', श्री. म. माटे – 'चित्रपट' (मी व मला दिसलेले जग), श्री. के. क्षीरसागर- 'तसबीर आणि तकदीर', वि. द. घाटे- 'दिवस असे होते', ना. सी. फडके- 'माझं जीवन एक कादंबरी', अनंत काणेकर- 'अनंतिका', वि.स. खांडेकर –'एका पानाची कहानी', पु. भा. भावे- 'प्रथम पुरुषी एकवचनी', वामनराव चोरघडे –'जडणघडण', ग. दि. माडगुळकर- 'वाटेवरच्या सावल्या', विश्राम बेडेकर- 'एक झाड दोन पक्षी', वि. भि. कोलते –'अजून चालतो चि वाट', गंगाधर गाडगीळ –'एका मुंगीचे महाभारत', मामा वरेरकर – 'माझा नाटकी संसार', व. दि. कुलकर्णी –'धुळाक्षरांकडून मुळाक्षरांकडे', आनंद यादव यांनी चार भागांमध्ये कादंबरी स्वरूपांत आत्मचरित्रांचे लेखन केलेले आहे. त्यात 'झोंबी', 'नांगरणी' 'घरभिंती', आणि 'काचवेल' यांचा समावेश होतो. या काही निवडक साहित्यिकांनी लिहीलेल्या मराठी आत्मचरित्रांचा निर्देश करता येईल.

गायन, अभिनय, नृत्य, संगीत अशी केलेची निरनिराळी क्षेत्रे आहेत. या क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या अनेक मराठी कलावतांनी लिहीलेली आत्मचरित्रे प्रसिद्ध आहेत. त्यांना वाचनियतादेखिल प्राप्त झालेली आहे. प्रत्यक्षातील कलावंतांचे जीवन जाणून घेणे ही त्यांच्या चाहत्यांची इच्छा असते. त्या दृष्टिने मराठीतील कलावंतांची आत्मचरित्रे वाचनीय ठरतात. रंगभूमीवर अभिनय करणाऱ्या अभिनेत्यांच्या आत्मचरित्रांमध्ये चिंतामनराव कोल्हटकर यांचे 'बहुरूपी', नानासाहेब फाटक -'मुखवट्यांचे जग', बापुराव माने-'माझे कलाजीवन', मामा पेंडसे- 'केशराचे शेत', श्रीराम लागू- 'लमाण', चितरंजन कोल्हटकर –'रंगात रंगलो मी', दिलीप प्रभावळकर- 'एका खेळीयाने, वसंत शिंदे – 'विनाद वृक्ष' अशी कितीतरी अभिनेत्या कलावंतांची आत्मचरित्रे प्रसिद्ध आहेत.

मराठी साहित्य आणि राजकारण यांचा निकटचा संबंध आहे. राजकीय जीवनाशी निगडीत चित्रण साहित्यात झालेले आहे. कथा, कादंबरी, नाटक याप्रमाणेच ते आत्मचरीत्रातही वाचावयास मिळते. देशाच्या व राज्याच्या प्रगतीच्या दिशा ठरवण्यासाठी राजकीय नेत्यांनी लिहीलेली आत्मचरित्रे मार्गदर्शक ठरतात. या मराठीतील राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्रांच्या संदर्भात रणधीर शिंदे यांचे मत महत्त्वाचे आहे. "राजकीय आत्मचरित्रांमधून त्या त्या प्रदेशातील राष्ट्र- राज्याचा राजकारण नकाशा अभिव्यक्त आलेला असतो. राजकीय भूमिका त्यातले अंत:संघर्ष आणि समाज वाटचालीचे दर्शन त्यामधून घडविलेले असते. त्यामुळे राजकीय आत्मकथनांना समाजशास्त्रीयदृष्ट्या विशेष महत्त्व असते."[२] काही उदाहरणादाखल मराठीतील राजकीय आत्मचरित्रे सांगता येतील. यात यशवंतराव गडाख –'अर्धविराम', यशवंतराव चव्हाण –

'कृष्णाकाठ', मनोहर जोशी -'२५-५०-७५', राजू शेट्टी- 'शिवार से संसद', शरद पवार- 'लोक माझे सांगाती', भाई संपतराव पवार- 'मी लोकांचा सांगाती', मधु लिमये-'आत्मकथा' इत्यादी आत्मचरित्रांमधून स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय घडामोडीपासून ते आजपर्यंतचा कालखंड वाचावयास मिळतो. काँग्रेस, भाजप, कम्युनिष्ट, समाजवादी, प्रज्ञावादी इत्यादी राजकीय विचारप्रणाल्या, त्यांचा सामान्य लोकांवरील प्रभाव इत्यादी अनेक गोष्टी स्पष्ट होतात.

उद्योगपती व व्यावसायिक व्यक्तिंची अनेक आत्मचरित्रे मराठीत आहेत. विविध उद्योग व्यवसायांविषयीची माहिती या आत्मचरित्रांमध्ये आहे. विविध उद्योग व्यवसातील व्यवहार, परदेशी ग्राहक, कंपन्यासोबतचे संबंध यांचेही दर्शन घडेते. अनेक महाराष्ट्रीयन व्यक्तींनी उद्योगविश्वात आपले कर्तृत्व गाजवले आहे. त्यांचे कष्ट, वाट्याला आलेला संघर्ष, उद्योग व्यवसायातील यशापयश त्यांनी आपल्या आत्मचरित्रांमधून सांगितले आहे. त्यातील काही निवडक आत्मचरित्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील. बी. जी. शिर्के –'उद्योगपर्व', गजानन पेंढारकर –'कर्म चाले संगती', जैन इरिगेशनचे संस्थापक भवरलाल जैन- 'ती आणि मी', राम कर्णिक –'ऑटोमोबायोग्राफी', पर्यटन क्षेत्रातील अग्रगण्य नाव म्हणजे हे केसरी पाटील होय. त्यांनी 'प्रवास एका प्रवासाचा' हे मराठी आत्मचरित्र लिहिले आहे. पॅकींग यंत्र निर्मिती करणारे रमेश जोशी यांचे 'माझी कार्पोरेट यात्रा', विदर्भातील नामवंत उद्योजक प्रभाकर मुंडले यांचे – 'आम्हीबी घडलो', विजय काळे –'उटणे, पोळ्या आणि मी', सुधीर निरगुडकर –'एक असतो बिल्डर' इत्यादी काही आत्मचरित्रे सांगता येतात. त्याचबरोबर प्रशासकीय सेवा हे एक महत्त्वाचे कार्यक्षेत्र आहे. या क्षेत्रात कर्तृत्व का गाजवणाच्या काही प्रशासकीय अधिका-यांची मराठी आत्मचरित्रे प्रसिद्ध आहेत. त्यात डॉ. रवींद्र सिंघल – 'कुशावर्ताचा कोतवाल', यशवंत व्हटकर-'सत्यमेव जयते', इसाक बागवान - 'इसाक बागवान', पोलीस अधिक्षक सुरेश खोपडे- 'नवी दिशा', कुसुम देव – 'ड्युटी फर्स्ट', ज्ञानेश्वर मुळे-'माती, पंख, आकाश', विश्वास नांगरे पाटील- 'मन में है विश्वास', भारत आंधळे- 'गरुडझेप', राजेश पाटील-'ताई मी कलेक्टर व्हईनू' इत्यादी लक्षणीय नावे सांगता येतील. प्रशासकीय सेवेसोबतच प्रत्रकारीता या सेवेला अलीकडे खूप महत्त्व आलेले आहे. पत्रकारिता हा समाजाचा आरसा मानला जातो. या क्षेत्रात अनेक नामवंतांनी आपली कारकीर्द गाजवलेली आहे. ती त्यांच्या आत्मचरित्रांमध्ये चित्रीत झालेली आहे. यापैकी ना. भि. परुळेकर- 'निरोप घेता', माधव गडकरी- 'निधरि ते लोकसत्ता', वि.स. माडीवाले – 'अशी ही बिकट वाट', मा. पं. शिखरे- 'स्मृतीची चाळता पाने' इत्यादी.

या वरिल आत्मचरित्रांपेक्षा एक वेगळे आत्मचरित्र लेखनाचे क्षेत्र आहे ते म्हणजे आजारी व्यक्तीची आत्मचरित्रे. विविध दुर्धर आजारांना माणसे कशी सामोरी जातात, त्यातून त्यांना शारीरिक मानसिक यातना

कशा सोसाव्या लागतात इत्यादी वैशिष्ठे या आत्मचरित्रांमध्ये दिसतात. या प्रकारातल्या आत्मचरित्रांना 'आत्मव्याधीकथन' असा शब्दप्रयोग वापरता जातो. इंग्रजीत त्याला 'ऑटोपेथोग्राफी' म्हणतात. या अनुषंगाने डॉ. शोभा पाटील यांचे मत विचारात बघेण्याजोगे आहे. " 'ऑटोपथॉग्राफी' या शब्दाचे 'आत्मव्याधीकथन' अशा स्वरूपाचे मराठी रूपांतर करून साधे मानवी आयुष्य टिकवण्यात, त्यासाठी झगडण्यात, वेगवेगळ्या जीवघेण्या अनुभवांना सामोरे जाण्यात जो संघर्ष करावा लागतो, त्याचे चित्रण हा ही आत्मकथनांचा विषय होय, हे आत्मव्याधीकथनाने सिद्ध करणारी, 'ऑटोपथॉग्राफी' ही आत्मकथनांची नवी जात आहे. स्वजीवनाकडे पाहणारी ती नवी दृष्टी आहे."[३] या आत्मचरित्र प्रकारात काही निवडक नावे सांगता येतात. चंद्रप्रभा जोगळेकर 'चंद्रकलेच्या भेटी', उषा सेठ 'माझी नात', नीला सत्यनारायण 'एक पूर्ण एक अपूर्ण', पद्मजा फाटक 'हसरी किडनी', बाळ राणे 'आमुचा प्याला दुःखाचा', प्रज्ञा शाह 'कँन्सर माझा सांगाती', अमृता सप्रे 'फिरून नवी जन्मेन मी', अभय बंग 'माझा साक्षात्कारी हृदयरोग', विशाखा पाठक 'मधुमेह नाबाद ३६', कल्पना जावडेकर 'पार्किन्सनचे दिवस', नसीमा हुरजूक 'चाकाची खुर्ची, नीता गद्रे 'एका श्वासाचं अंतर', इत्यादी आत्मचरित्रे आहेत.

याशिवाय सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची काही आत्मचरित्रे आहेत. महाराष्ट्राला जशी समाजसुधारकाची परंपरा आहे; त्याचप्रमाणे विविध संस्था, संघटना, चळवळी यांच्या माध्यमातून विधायक आणि रचनात्मक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याचींही एक परंपरा आहे. सामाजिक काय करणे ही तितकी साधी सोपी गोष्ट नाही. ती तारेवरची कसरत असते. आदिवासी, दलित, भटके-विमुक्त, दिव्यांग, मुस्लिम समाजातील तलाकपिडीत स्त्रीया, देहव्यापार करणाऱ्या स्त्रीया इत्यादी उपेक्षित वचितांच्या कल्याणासाठी महाराष्ट्राच्या विविध कानाकोऱ्यात सामाजिक कार्यकर्त्यानी सामाजिक कार्य केलेले आहे. आजही सुरु आहे. त्या सामाजिक कार्याचा दस्तऐवज या सामाजिक कार्यकर्त्यानी लिहीलेल्या आत्मचरित्रांमधून अधोरेखित होतो. या आत्मचरित्रांमध्ये प्रकाश आमटे यांचे 'प्रकाशवाटा', एकनाथ आवाड यांचे 'जग बदल घालुनी घाव', विलास चाफेकर 'रात्रंदिन आम्हा...' गोदावरी परुळेकर 'जेव्हा माणूस जागा होता', गिरीश प्रभुणे – 'पारधी', विजय फळणीकर - 'पराजय नव्हे विजय', सीमा साखरे 'संग्राम', विजया लवाटे 'स्पर्श मानव्याचा', सुनिलकुमार लवटे 'खाली जमिन वर आकाश', चंद्रकांत वानखडे – 'आपुला चि वाद आपणांसी', सय्यदभाई 'दगडावरची पेरणी' व सिंधुताई सपकाळ 'मी वनवासी' इत्यादी आत्मचरित्रांची नावे सांगता येतात.

मराठीत 'बलुतं' या नावाने दया पवारांचे आत्मकथन प्रसिद्ध झाले. तेव्हांपासून मराठीत समाजातील विविध जाती जमातींची आत्मकथने प्रकाशित होऊ लागली. या आत्मचरित्र तथा आत्मकथनांनी मराठी

आत्मचरित्रपर लेखनात फार मालाची भर घातली आहे. त्यामुळी मराठी आत्मचरित्र लेखनाच्या कक्षा रुंदावल्या. दया पवार 'बलुतं', प्र. ई. सोनकांबळे 'आठवणींचे पक्षी', माधव कोंडविलकर 'मु.पो. देवाचे गोठणे', लक्ष्मण माने 'उपरा', लक्ष्मण गायकवाड 'उचल्या', उत्तम बंडू तुपे 'काट्यावरची पोटं', शंकरराव खरात 'तराळ अंतराळ', शरणणकुमार लिंबाळे 'अकरमाशी', दादासाहेब मोरे 'गबाळ', मुक्ता सार्वगौड 'मिटलेली कवाडे', रुस्तुम अचलखांब 'गावकी', श्रीरंग तलवारे 'धूळपाटी', तुषार भाग्यवंत 'कोंडाळ', शांताबाई कांबळे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', उत्तम कांबळे 'वाट तुडवताना', भालचंद्र मुणगेकर 'असा मी घडलो' इत्यादी दलित आत्मकथनांनी मराठी साहित्याला उंची प्राप्त करून दिली. या आत्मचरित्रांना विविध नावांनी संबोधले जाते. त्यात 'आत्मकथन' 'आत्मकथा', 'स्वकथा', 'स्वकथन' इत्यादी नावे अनेक अभ्यासकांनी सुचवलेली आहेत. यातून नव बौध्द, मातंग, चर्मकार, कोल्हाटी, पाधी, वडार, आदिवासी अशा विविध दबलेल्या व पिळलेल्या जातीगटांमधील जीवनाचे रखरखीत वास्तव जीवनदर्शन घडते. बहिष्कृत, माणूसकीला पारख्या झालेल्यांचे जग दलित आत्मकथनांनी सर्वप्रथम जगाच्या वेशीवर टांगले आहे.

या आत्मचरित्रांशिवाय अन्य काही आत्मचरित्रांची लेखनक्षेत्रे आहेत. त्यात मुस्लीम मराठी आत्मचरित्रे, शिक्षक प्राध्यापकांची, खेळाडू क्रिडापटू, आदिवासी, भटके विमुक्त, कादंबरीमय आत्मचरित्रे, अनुवादीत व शब्दांकित आत्मचरित्रे इत्यादी अनेकविध स्वरूपाची आत्मचरित्रे मराठीत आहेत. विस्तारभयास्तव त्यांचा धांडोळा घेणे येथे कठीण आहे. म्हणून संक्षिप्त स्वरूपात त्यांचा विचार प्रस्तुत लेखनात केलेला आहे.

**निरीक्षणे :**

एकंदरीतच मराठीत आत्मचरित्र हा प्रकार दिवसेंदिवस विकसित व लोकप्रिय होताना दिसत आहे. आत्मचरित्राचे पुस्तक विकत घेऊन वाचले पाहीजे ही प्रवृत्ती वाढीस लागलेली दिसते. समाजातील विविधस्तरीय जीवनानुभवांचे दर्शन मराठी आत्मचरित्रे घडवताना दिसतात. सामाजिक, राजकारण, उद्योग, कला, शिक्षण, समाजसेवा, क्रीडा, कला, पत्रकारिता आदी क्षेत्रांमधील कर्तबगार व्यक्तींनी आत्मचरित्रांचे लेखन केले आहे. एकूणच मराठी आत्मचरित्रांचे लेखन विचारात घेता ते अधिक प्रमाणात वाङ्मयबाह्य क्षेत्रातील व्यक्तींनी केलेले आहे.

**संदर्भसूची :**

१. गोखले उज्ज्वला, 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्वरूप आणि चिकित्सक विवेचन', संस्कृती प्रकाशन पुणे, ३ मे २०२३, पृ.१०.

२. शिंदे रणधिर, 'राजकीय आत्मचरित्रे : स्वरूप आणि समीक्षा', (पाठराखण), (संपा.) मोतीराम पौळ, अक्षरदान प्रकाशन पुणे.

३. पाटील शोभा, 'आत्मचरित्र' (स्त्री साहित्याचा मागोवा खंड ४), साहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुणे, डिसेंबर २०२२ पृ. १८७.